RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २५(७)] शुक्रवार, डिसेंबर १२, २०२५/अग्रहायण २१, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ११९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१२ डिसेंबर, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXXXVIII OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MINIMUM WAGES ACT, 1948, IN IT'S APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८.**

**किमान वेतन अधिनियम, १९४८ महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९४८ चा ११. **ज्याअर्थी,** किमान वेतन अधिनियम, १९४८, हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी त्यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:-

**१.** (१) या अधिनियमास किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**२.** किमान वेतन अधिनियम, १९४८ (यात यापढे त्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २२ मध्ये, -

(एक) " सहा महिनेपर्यंत " या मजकूराऐवजी, " पाच वर्षांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल, आणि

(दोन) " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकूराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२-ख ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईलः-

अपराधांची दखल घेणे.

" २२-ख. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाच्या कलम २२ खालील अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असतील."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

संविधानाच्या अनुच्छेद ३८ मध्ये नमूद केलेले सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या आणि राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने किमान वेतन अधिनियम, १९४८ अधिनियमित करण्यात आलेला आहे. मजुरांच्या शोषणाच्या संधी कमी करण्यासाठी किमान वेतन वैधानिक दृष्टीने निश्चित करणे हे अधिनियमाचे विधिविषयक धोरण असल्याचे खुद्द या अधिनियमावरून स्पष्ट होते. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या मजूर वर्गाच्या कल्याणासाठी मुख्यतः हा अधिनियम संमत करण्यात आला. परंतु, कायद्याने विहित केलेल्या दराने मजुरांना किमान वेतन न देण्याची प्रवृत्ती दुर्दैवाने वाढत असून त्यामुळे या वर्गाला अतिशय कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. भांडवलवादी मनोवृत्तीच्या लोकांकडून त्यांचे शोषण केले जात आहे. तरतुदीच्या उल्लंघनाबद्दल दिली जाणारी कमी कडक आणि साधी शिक्षा हेच त्यांचे मुख्य कारण असल्याचे दिसते. अधिनियमाच्या संबंधित तरतुदींच्या उल्लंघनाविरूद्ध मजूर आणि कामगार यांना न्याय देण्यासाठी कायदेविषयक तरतुदींचा भंग करण्याबद्दल अधिक कडक शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे.

हे उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक १२ डिसेंबर,२०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.